सकाळ
गुरुवार, २६ मे २०१६

# पुणे विभागाचा ८७.२६ टक्के निकाल

**पुणे, ता. २५ :** पुणे विभागीय मंडळाचा बारावीचा निकाल ८७.२६ टक्के लागला आहे. त्यात यंदा घट झाली आहे. पुणे जिल्ह्याचा निकाल ८७.२३, नगरचा ८७.१२ आणि सोलापूर जिल्ह्याचा निकाल ८७.४८ टक्के आहे. यातही मुलींनी बाजी मारली आहे.

पुणे विभागात बारावीच्या परीक्षेला या वर्षी दोन लाख १८ हजार २३३ विद्यार्थी बसले होते. त्यात एक लाख २४ हजार ९९ मुले आणि ९४ हजार १३४ मुलींचा समावेश आहे. गेल्या वर्षी या विभागाचा निकाल ८८.४२ टक्के होता. विभागातील सुमारे दहा हजार १०३ पुनर्परीक्षार्थींनी ही परीक्षा दिली होती. त्यापैकी तीन हजार २५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांची टक्केवारी ३२.२० टक्के आहे.

विभागात परीक्षा देणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या मुलांपेक्षा कमी असली, तरी मुलींच्या निकालाची टक्केवारी मुलांपेक्षा अधिक आहे.



**सर परशुरामभाऊ कॉलेज : बारावीचा ऑनलाइन निकाल जाहीर झाल्यानंतर विविध शाखांमध्ये अव्वल क्रमांक मिळविलेले विद्यार्थी एकत्र आले होते.**

### नियमित विद्यार्थ्यांचा निकाल

| तपशील | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| परीक्षा दिलेले | ७,३१,३९२ | ५,८८,३६२ | १३,१९,७५४ |
| उत्तीर्ण | ६,१०,४०० | ५,३२,४८२ | ११,४२,८८२ |
| उत्तीर्णांची टक्केवारी | ८३.४६ | ९०.५० | ८६.६० |

उत्तीर्ण मुलींची टक्केवारी ९२.३०, तर मुलांची टक्केवारी ८३.४३ टक्के आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षीदेखील निकालावर मुलींची छाप अधिक आहे. विभागात विज्ञान शाखेचा निकाल सर्वाधिक ९३.७८ आहे. त्याखालोखाल वाणिज्य शाखा ८२.४५, व्यवसाय शिक्षण ८२.४५ टक्के आणि कला शाखेचा निकाल ७६.१३ आहे.

**पुनर्मूल्यांकनास प्राधान्य**

'जेईई'साठी प्रविष्ट होणाऱ्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी, त्यासाठी आवश्यक गुणपत्रिकांच्या छायाप्रती आणि त्यांचे पुनर्मूल्यांकन प्राधान्याने करून मिळणार आहे. सर्व विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनासाठी उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती घेणे बंधनकारक आहे. त्या मिळाल्यापासून पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपद्धतीचा अवलंब करावा आणि विहीत नमुन्यात अर्ज आणि शुल्क भरून विद्यार्थ्यांनी विभागीय मंडळाकडे अर्ज सादर करावेत. याविषयी अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयांशी संपर्क साधावा.

**श्रेणीसुधार/गुणसुधार योजना**

बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना श्रेणी वा गुणसुधार योजनेंतर्गत परीक्षा पुन्हा देता येईल. पान ३ वर »

### पुनर्परीक्षार्थी निकाल

| तपशील | विद्यार्थी |
|---|---|
| परीक्षा दिलेले | ६४,६४३ |
| उत्तीर्ण | २३,५३५ |
| टक्केवारी | ३६.४१ |